


खापणे महाविद्यालयात डीएलएलई विभागाच्या प्रथमसत्र प्रशिक्षण शिबिरात डॉ. ए. डी. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# डीएलएलई कलागुणांना संधी देणारा विभाग

## ए. डी. पाटील : प्रथमसत्र प्रशिक्षण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

पाचल : डीएलएलई हा विद्यार्थ्यांच्या अंतर्गत कलागुणांना संधी मिळवून देणारा विभाग असून, या विभागातील विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना समाजापर्यंत जाण्याची संधी मिळते. त्यातूनच विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना चालना मिळते. त्यामुळे या विभागात अधिकाधिक कार्यप्रवण होऊन विद्यार्थ्यांनी स्वत:ला सिद्ध करावे, असे आवाहन प्रा. डॉ. ए. डी. पाटील यांनी केले.

राजापूर तालुक्यातील पाचल येथील श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात डीएलएलई विभागाच्या प्रथमसत्र प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल, प्रा. बी. ए. कश्यप, ग्रंथपाल मनोहर कोंडागुर्ले, मुख्य लिपीक नरेश पाचलकर उपस्थित होते. प्रा. बी. ए. कश्यप यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचे स्वरुप स्पष्ट केले.

यावेळी प्राचार्य डॉ. के. एम. कोतवाल यांनी डीएलएलई विभागाद्वारे विविध उपक्रम घेतले जात असून, हे सारे उपक्रम विद्यार्थ्यांना समाजापर्यंत जाण्याची संधी मिळवून देत आहेत. या विभागातील उपक्रमांतून विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण मिळते. आपणही समाजाचे देणे लागतो व हे देणे या विभागाच्या माध्यमातून तुम्हाला पूर्ण करता येते, म्हणून या विभागाच्या विविध उपक्रमांतून अधिक काम करा व स्वत:ला सिद्ध करा, असे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बी. ए. कश्यप यांनी केले तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.